PDF Compressor Free Version

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** बल्लारशा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0196 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/02/2024 01:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 16/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2024
**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/02/2024 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/02/2024 01:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बामणी फाटा बल्लारपुर,बल्लारपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

PDF Compressor Free Version

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दशरथ भाऊराव कुबडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवेगाव ता राजुरा,बल्लारशा,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवेगाव ता राजुरा,बल्लारशा,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शालेन्द्र देवराव चांदेकर | | | 1. श्री वानखेडे यांचे घरी किरायान, जवाहर नगर वार्ड कर्नल चौक, जवळ राजुरा , राजुरा,राजुरा , चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराचे 10 नोटा | 5,000.00 |

PDF Compressor Free Version



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | sandisk कंपनिचे 32 gb क्षमता असलेले 2 मेमोरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक:- 16/02/2024

ठिकाण:- बल्लारपूर

मी दशरथ भाउराव कुबडे, वय 55 वर्ष, रा. नवेगांव, ता. राजुरा, जि. चंद्रपूर येथे आपले परिवारासोबत राहत असुन शेती हा व्यवसाय करतो. आज दि. 16/02/2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे दिनेश अंबादास आत्राम व निकेश लखमापूरे रा. नवेगाव यांचेसह प्रत्यक्ष हजर राहुन श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपुर यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.'सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी मौजा नवेगांव ता. राजुरा येथील राहणार असून शेतीचा व्यवसाय करतो. माझी मौजा केळझर येथे 12 एकर शेती आहे. माझे शेतात शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विद्युत पंपाची सोय करण्यात आलेली असून सदर पंप सुरू करण्याठी थ्री फेज विद्युत पुरवठा सुरू असने आवश्यक आहे. तसेच माझे गावतील ईतर शेतक-यांकडे विद्युत पंपाची सुविधा आहे. आमचे शेत विरूर (स्टे.) येथील एम.एस.ई.बी. कार्यालय अंतर्गत येत असून आमच्या शेत शिवारातील विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम लाईनमेन चांदेकर यांचेकडे आहे. लाईनमेन चांदेकर हे आम्हास प्रत्येक वेळी विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यावरून पैशाची मागणी करून सतत त्रास देत असतात. यापूर्वी जुन/2023 मध्ये वादळी वा-यामुळे आमचे शेतातील विद्युत पुरवठा खंडीत झालेला होता तेव्हा चांदेकर यांनी विद्युत पुरवठा सुरळीत करण्याकरीता आम्हा शेतकर-यांना पैशाची मागणी केली होती. तेव्हा शेतीची कामे तात्काळ करणे गरजेचे असल्याने चांदेकर यांची लाचसंबंधी आपलेकडे तक्रार न देता आम्ही काही पंपधारक शेतकर-यांनी पैसे जमा करून चांदेकर यांना दिले होते. त्यानंतरही श्री. चांदेकर हे आमचे शेतातील विद्युत पुरवठा जाणुन बुजुन आम्हाला त्रास देण्याचे उददेशाने वारंवार बंद करीत असतात. श्री. चांदेकर यांनी मागील तीन दिवसांपासून केळझर परिसरात आम्हा शेतक-यांचे शेतातील विद्युत पुरवठा बंद करून ठेवला असुन काल दिनांक 15/02/2024 रोजी अंदाजे स. 10/30 ते 11/00 वा. दरम्यान श्री. चांदेकर यांनी माझे मोबाईलवर फोन केला आणि म्हणाले की, तुमचे शेतातील विद्युत पुरवठा पूर्ववत सुरू करायचा असेल तर प्रत्येकी 20 किलो तांदूळ तुम्हाला माझेकरीता द्यावे लागतील. त्यावर आम्ही सर्वांनी तांदूळ विकून टाकला आहे असे म्हणलो असता श्री. चांदेकर यांनी प्रत्येकी 1,500/- रू. असे एकुण 7,500/- रू. द्यावे लागतील तेव्हाच तुमचे शेतातील विद्युत पुरवठा सुरू करणार असे म्हणाले. त्यावरून मी त्यांना नाईलाजास्तव होकार दिला. याबाबत मी ईतर शेतक-यांना याबाबत सांगितले असता त्यांनी पण नाईलाजास्तव होकार देवून प्रत्येकी 1000/- रू. जमा करण्याचा व उर्वरित रक्कम नंतर देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आज दि. 16/02/2023 रोजी स. 11/00 वा. दरम्यान श्री. चांदेकर यांचा मला फोन आला व पैसे जमा झाले काय याबाबत विचारपूस करून दुपारी राजुरा येथे भेटण्यास सांगितले. लाईनमॅन श्री. चांदेकर यांना माझी व ईतर शेतक-यांची लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी व माझे गावातील श्री दिनेश अंबादास आत्राम व निकेश लखमापूरे, रा. नवेगांव यांचेसह आज दिनांक 16/02/2024 रोजी दुपारी अंदाजे 12/00 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे समक्ष हजर होवून माझे सोबत असलेल्या श्री. दिनेश आत्राम यांचे हस्ताक्षरात लेखी तक्रार देत आहे. माझा गै.अ. श्री. चांदेकर, लाईनमॅन यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही तसेच कोणतेही वैमनस्य नाही. लाचरक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम मी, दिनेश आत्राम, निकेश लखमापूरे, दिवाकर कुबडे व घनश्याम

PDF Compressor Free Version
आस्वले असे आमचे वैयक्तिक बचतीतुन प्रत्येकी 1,000/- रू. जमा झालेले असे एकुण 5,000/-रू. यावेळी आपणाकडे लाचरक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी माझे तक्रारीवरुन आमचे शेतातील विद्युत पुरवठा सुरळीत चालू ठेवण्याचे कामाकरीता 7,500/- रू. लाच मागणारे गै.अ. श्री. चांदेकर लाईनमॅन यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही होणेस विंनती आहे .'' याप्रकारची लेखी तक्रार दिली होती.यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले मॅडम यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेले महाराष्ट्र जीवन प्राधिकारण विभाग, चंद्रपूर येथील श्री. शुध्दलवार व श्री. चौधरी या दोन शासकीय पंचाशी व कार्यालयातील स्टाफची मला ओळख करुन दिली. त्यांनतर श्रीमती भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर माझ्या सहीचा सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व श्रीमती भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार नरेश नन्नावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाई करुन वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मी जमा केलेली सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी रक्कम रू. 5,000/- (रू. 500/- दराच्या 10 चलनी नोटा) घेतल्या आणि सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदर नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षिक करून दाखविले व सदर नोटा एका लिफाप्यात टाकुन सदर लिफाफा भोसले मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यांनतर श्री. चांदेकर यांनी मला सकाळी फोनवर राजुरा येथे येवून भेटण्यास सांगितले असल्यामुळे भोसले मॅडम यांनी पुढील पडताळणी व सापळा कारवाई राजुरा येथे जावून करण्याबाबत सांगितले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 श्रीमती भोसले मॅडम यांनी तयार केला.) त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला माझे दुचाकी वाहनाने त्यांचे शासकीय वाहनाचे मागे मागे राजुरा येथे येण्यास सांगुन दोन्ही पंच व कार्यालयीन स्टाफसह त्यांचे शासकीय वाहनाने राजुरा कडे निघाले. मी माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच. 34-बि.यु.2844 ने माझे सोबत ला.प्र.वि. कार्यालय येथे आलेल्या आत्राम सोबत भोसले मॅडम यांचे शासकीय वाहनाचे मागे मागे दुपारी 01/40 वा. रवाना झालो. अंदाजे दुपारी 02/30 वा. दरम्यान राजुरा येथील रेल्वे पुलाच्या बाजुला असलेल्या राजुरा कडे जाणा-या जुन्या रोडवर रेल्वे पटरीजवळ भोसले मॅडम यांनी आपले शासकीय वाहन थांबविले असता मी पण त्यांचे मागेच माझे दुचाकी वाहन थांबविले. त्यानंतर मी श्री. चांदेकर यांना माझे मोबाईलवरून फोन लावून फोन स्पिकरवर ठेवून भोसले मॅडम व पंचासमक्ष राजुरा येथे आल्याबाबत सांगितले असता चांदेकर यांनी ते विरूर येथे ड्युटीवर असुन अर्ध्या तासाने राजुरा येथे येत असल्याबाबत मला सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष श्री. चांदेकर यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यांनतर अंदाजे दुपारी 03/30 वा. चांदेकर यांचा मला फोन आला असता मी तो उचलुन स्पिकरवर ठेवून त्यांचेशी भोसले मॅडम व पंचासमक्ष बोलणी केली असता ते राजुरा येथे आले असुन त्यांनी मला राजुरा येथील कर्नल चौकात येण्यास सांगितले. त्यावरून दुपारी 03/35 वा. दरम्यान भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार नरेश नन्नावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-बि.यु.2844 नी पंच क्र. 01 यांचेसह राजुरा येथील कर्नल चौक येथे पडताळणी करीता पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत राजुरा येथील कर्नल चौक येथे गेलो असता चांदेकर साहेब चौकात त्यांचे दुचाकी घेवून थांबून दिसल्याने मी पंच क्र.1 यांचेसह चांदेकर साहेब थांबुन असलेल्या ठिकाणी आपले दुचाकी वाहन थांबवीले. पडताळणी दरम्यान चांदेकर साहेब यांना मी 'तुम्ही मागे म्हणले होत तं कस कराच ' असे म्हणालो असता त्यांनी मला 'पंधरा पंधराशे रूपये' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'पंधरा पंधराशे रूपये जास्त होइल न जी थोडं' असे म्हणालो असता त्यांनी मला 'कायचे जास्त होते जी बराबर हायन, वीस पंचवीस किलो तांदूळ दिले जी' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'थोडे बहोत जमा झाले होते चार पाच हजारं' असे म्हणालो असता त्यांनी मला 'बाकी किती व्हायचे आहे, बाकीचे करून घ्या' असे म्हणाले असता मी बामणी येथे जात असल्याचे सांगितल्याने त्यांनी पैसे बामणी येथेच देण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना 'नाव वारू द्याल माल, दोन चार दिवसाले सुकतच आहे माल तपन आहे न' असे म्हणालो असता त्यांनी मला 'हो तीन दिवस झाले, घे चालु कराले लावतो पहा सकाळी' असे म्हणुन ते निघतांना फोन करतो असे सांगितले. असे

PDF Compressor Free Version

मधुन चांदेकर साहेब यांनी मला लाचेची मागणी करून बामणी येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे मी तेथुन
माझे दुचाकी वाहनाने पंचासह भोसले मॅडम थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. लाचरक्कम मागणीबाबतची
पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस
रेकॉर्डर बंद करण्यात आले.त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणी करून आल्यानंतर
अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली.
अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम,
दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस उप अधीक्षक भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन
संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता चांदेकर यांनी माझ्या व ईतर शेतक-यांच्या शेतातील विद्युत पुरवठा सुरू
ठेवण्याचे कामाकरीता प्रत्येकी 1,500/- रू. अशी एकुण 7,500/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती
5,000/-रू. बामणी येथे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून श्री. चांदेकर यांचेविरुध्द पुढील
सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य ईशारा मिळतातच लाच रक्कम स्विकारणा-
यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळापुर्व
अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली.
अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. सापळापुर्व अंगझडती यादीवर
भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.त्यानंतर मी सायंकाळी 04/20 वा. दरम्यान चांदेकर यांचा माझे
मोबाईलवर मिस कॉल आला असता मी माझे मोबाईल वरून भोसले मॅडम व पंचासमक्ष चांदेकर साहेब यांना फोन
करून फोन स्पिकरवर करून बोलणी केली असता चांदेकर साहेब राजुरा येथुन निघाले असुन ते थोड्या वेळात
बामणी फाट्याजवळ येत असल्याचे सांगितले. त्यांनतर मला अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात
आली. ती माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आली. सापळा कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या
दक्षतेबाबत सुचना देवुन श्री. चांदेकर यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे
गळ्यातील दुपट्टा काढून दुपट्टा उजव्या हातात ठेवण्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगितले. त्यावेळी सापळा
पथकातील सदस्य ईशारा मिळतातच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.(उर्वरीत
फिर्याद मुळ फिर्यादी प्रमाणे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Asif Baktawar Sheikh(I (Inspector)) / pcmh86017 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

PDF Compressor Free Version

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

९२१२५

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Asif Baktawar Sheikl
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pcmh86017

(स.फौ. सुभाष जेठे/१९५४)

स्टेशन डायरी अंमलदार
पोलीस स्टेशन ...

PDF Compressor Free Version

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)